# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 28/03/2020 (शनिवार)
(सायंकाळ)

### अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारु बाळगणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. बोरी :– दिनांक 27/03/2020 रोजी बोरी पोलीसांना गुप्त माहिती मिळाली की, मौजा असोली शिवार पारधी बेडा व मौजा ढवळपेठ शिवार येथे काही इसम गावठी मोहाफुल हातभट्टीची दारू गाळण्याचा अवैधरीत्या व विनापरवाना व्यवसाय करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे बोरी पोलीसांनी 3 ठिकाणी नमुद घटनास्थळी धाडी टाकल्या. पहिल्या प्रकरणात मौजा असोली शिवार पारधी बेडा परिसरात आरोपी नामे– आकाश तुलाराम वाघमारे, वय 35 वर्ष, रा. आसोली शिवार, पारधी बेडा हा दारू गाळतांना मिळून आला. आरोपीच्या ताब्यातून 20 मोठे प्रति ड्रममध्ये 4 हजार लिटर मोहाफूल सडवा रसायण प्रति लिटर शंभर प्रमाणे 4,00,000/–रू., 20 मोठे लोखंडी ड्रम प्रति ड्रम 2 हजार रूपये प्रमाणे 40,000/– रू. असा एकुण कि. 4,40,000/–रू. चा माल अवैधरित्या मिळुन आला. दुसऱ्या प्रकरणात मौजा असोली शिवार पारधी बेडा परिसरात आरोपी नामे– अनुप यादव भोसले, वय 40 वर्ष, रा. आसोली शिवार, पारधी बेडा हा दारू गाळतांना मिळून आला. आरोपीच्या ताब्यातून 20 मोठे प्रति ड्रममध्ये 4 हजार लिटर मोहाफूल सडवा रसायण प्रति लिटर शंभर प्रमाणे 4,00,000/–रू., 20 मोठे लोखंडी ड्रम प्रति ड्रम 2 हजार रूपये प्रमाणे 40,000/– रू. असा एकुण कि. 4,40,000/–रू. चा माल अवैधरित्या मिळुन आला. तिसऱ्या प्रकरणात मौजा ढवळपेठ शिवार परिसरात आरोपी नामे– सुरकास ज्ञानेश्वर पवार, वय 45 वर्ष, रा. ढवळापेठ शिवार हा दारू गाळतांना मिळून आला. आरोपीच्या ताब्यातून 20 मोठे प्रति ड्रममध्ये 4 हजार लिटर मोहाफूल सडवा रसायण प्रति लिटर शंभर प्रमाणे 4,00,000/–रू., 20 मोठे लोखंडी ड्रम प्रति ड्रम 2 हजार रूपये प्रमाणे 40,000/– रू. असा एकुण कि. 4,40,000/–रू. चा माल अवैधरित्या मिळुन आला. तिन्ही प्रकरणात असा एकूण 12 हजार लिटर मोहाफूल साहित्य किं. 13,20,000/– रू.चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी पो. स्टे. बोरी येथे आरोपीतांविरुध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले असुन आरोपींतांना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

# अकस्मात मृत्यू

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 05 कि. मी. अंतरावर जाम नदीचे पात्र येथे दिनांक 27/03/2020 चे 19.00 वा. पुर्वी फिर्यादींचे वडील नामे– चिरकुटराव लहानुजी मोरे, वय 43 वर्ष, रा. नारसिंगी ता. नरखेड यांना मानसिक आजार व आंधळेपणा होता. चिरकुटराव मोरे हे घरा बाहेर फिरण्याकरिता गेले होते. परंतु घरी परत न आल्याने त्यांचा शोध घेत असता, गावातील बंडु बाबाराव काकडे व नथ्थुजी मोरे यांनी सांगितले की, फिर्यादीचे वडील हे जाम नदीच्या पात्रात पाण्यात बुडून मृत अवस्थेत दिसून आले. माहिती मिळताच फिर्यादी व काही लोक त्याठिकाणी गेले असता, फिर्यादीचे वडील मृत अवस्थेत आढळून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विष्णु चिरकुटराव मोरे, वय 43 वर्ष, रा. नारसिंगी नरखेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनि श्री सोनवणे 7798801816 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर